# मुंबई विद्यापीठ

तात्काळ/अति महत्वाचे
स्मरणपरिपत्रक :—१

परिपत्रक

क्र.वि.नि.वि.वि./४३२/४/२०१४

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयसतर्फे संबधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, सर्व महाविद्यालयात मराठी भाषा दिवस साजरा होतो का? व तसेच त्याचा आढावा विद्यापीठात सादर का केला जात नाही नमुद माहितीबद्दल विचारणा केलेली होती. याबाबत विद्याविषयक नियोजन विकास विभागास मराठी भाषा दिन साजरा करण्याबाबतची माहिती/आढावा अद्याप सादर केलेला नाही त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील संबंधित माहिती **दिनांक १३ जून २०१४ पर्यंत सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन विकास विभाग कक्ष क्र. १३२ पहिला माळा, फोर्ट मुंबई — ४०० ०३२** येथे लेखी स्वरूपात तात्काळ पाठविण्याची व्यवस्था करावी. आपल्याकडील माहिती प्राप्त न झाल्यास तसेच शासनाने याबाबतीत कोणत्याही प्रकारची चौकशी किंवा कारवाई केलेली नाही यानंतर आपल्याकडील मराठी भाषा दिनाची माहिती विद्याविषयक नियोजन विकास विभागास उपरोक्त **(दिनांक १३ जून २०१४)** पर्यंत प्राप्त न झाल्यास जर काही कारवाई/आदेश दिले तर त्या आदेशानुसार आमच्या विभागामार्फत समिती नेमुन कारवाई केली जाईल कृपया याची नोंद घ्यावी.

**ज्या महाविद्यालयांनी विद्याविषयक नियोजन विकास विभागास यापूर्वी माहिती पाठविली असेल त्यांनी कृपया माहिती पाठवू नये.**

सहाय्यक कुलसचिव
(वि.नि.वि.वि)

मुंबई:—४०० ०३२
दिनांक:— ९ जून, २०१४

---

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयसतर्फे संबधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि तात्काळ कार्यवाहीकरिता रवाना

सहाय्यक कुलसचिव
(वि.नि.वि.वि)